# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ६७-२३ दिनांक :- २८/०२/२०२३

## N.H.English Academy, Naya Nagar येथे सायबर गुन्हे कक्षाकडून शालेय विदयार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेय शिक्षण घेणाऱ्या विदयार्थामध्ये सायबर गुन्हयांचे अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरीता एन.एच.इंग्लिश अकॅडमी, नयानगर, मिरारोड व सायबर गुन्हे कक्ष, मि.भा.व.वि. यांचे संयुक्त विदयमाने दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी एन.एच.इंग्लिश अकॅडमी, नयानगर, मिरारोड येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

सदर विदयार्थी संवाद मेळावामध्ये विद्यार्थी यांना दैंनदीन सोशल मिडीया वापराबाबत होणारे गुन्हे, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज व त्यांचे प्रश्नांचे निरसन करण्यात आले.

सदर विदयार्थी संवाद मेळावा श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक प्रसाद शेनोळकर, ठाकूर रामनारायण कॉलेज, दहीसर येथील सायबर गुन्हे कक्ष इंटर्न सायशा दलाल यांचे उपस्थितीत पार पडला असून सदर संवाद मेळावा करीता एन.एच.इंग्लिश अकॅडमी, नयानगर, मिरारोड येथील १८ शिक्षक व आठवी, नववी, दहावी चे एकूण ३५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.









----ooo----